## नि.क्र. ६३ वरील आदेश

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीचे म्हणण्यानुसार, दावा जाहीर होवून मिळणेसाठी, सरसनिरस मानाने जमिनीचे वाटप होवून मिळणेसाठी व निरंतर मनाई मिळणेसाठी प्रतिवादीविरुद्ध दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र. ९ शारदा हरिचंद्र जाधव या मयत झाल्या आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर वारस मुलगा प्रतिवादी क्र. ८ हे एकमेव वारस असल्याने अभिलेखावर यापूर्वीच आहेत. ईतर वारस नसलेने प्रतिवादी क्र. ९ हिचे नावास कंस करण्यात येवून त्यापुढे 'मयत' असे लिहून त्यापुढे मयत वारस प्रतिवादी क्र. ८ असे दाव्याचे सरनाम्यात दुरुस्ती अर्जामध्ये लिहीलेप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मागितली आहे. सदरची दुरुस्ती ही औपचारीक स्वरुपाची आहे. दुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होत नाही. तरी वादीचा अर्ज मंजूर करावा ही विनंती.

२. प्रतिवादी यांनी अर्जास तीव्र हरकत नोंदविली आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. वादीचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. वादीने सदर दावा प्रतिवादी विरुध्द दावा जाहीर होवून मिळणेसाठी, सरसनिरस मानाने जमिनीचे वाटप होवून मिळणेसाठी व निरंतर मनाई मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये वादीचे कथन असे की, दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी क्र. ९ हिचे नावास कंस करण्यात येवून त्यापुढे 'मयत' असे लिहून त्यापुढे मयत वारस प्रतिवादी क्र. ८ दुरुस्ती अर्जामध्ये लिहीलेप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मागितली आहे. सदर दुरुस्ती साधारण स्वरुपाची आहे. त्यामुळे दाव्यामध्ये तशी दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे. दुरुस्त अर्ज मंजूर झाल्यास दाव्याचे मूळ स्वरुपात बदल होत नाही. सबब वरीलप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी, अशी विनंती वादीने केली आहे.

५. याठिकाणी हे नमूद करणे जरुरीचे की, दावा जाहीर होवून मिळणेसाठी, सरसनिरस मानाने जमिनीचे वाटप होवून मिळणेसाठी व निरंतर मनाई मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत वादी मागणी करीत असलेली दुरुस्तीची गरज अनावधानाने निर्माण

झाली असून ती दाव्याच्या या टप्प्यावर मंजूर करणेस कायदेशीर बाधा नाही. दुरुस्ती केल्यास दावा गुणदोषावर निर्णायक करण्यास सहाय्य होणार आहे. त्यामुळे सदर दुरुस्ती मंजूर करणे उचित होईल.

६. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ प्रमाणे पक्षकार दाव्याच्या कोणत्याही टप्प्यावर वादपत्रामध्ये दावा निर्णायक करण्याकरीता आवश्यक ती असलेली दुरुस्ती करु शकतात. वादीची दाव्यातील मागणी ध्यानात घेता सदर दुरुस्ती दावा गुणदोषावर निर्णायक करण्याकरीता आवश्यक आहे. तसेच सदर दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीच्या हितास कोणताही बाध निर्माण होत नाही. तसेच सदर दुरुस्ती मंजूर करण्यास कोणताही कायदेशीर बाध असल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे उभयपक्षातील वाद कायमस्वरुपी संपविण्याकरिता तसेच प्रकरणांचे अनेकीकरण रोखण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे जरुरीचे आहे. सदर अर्ज मंजूर केल्याने दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. याउलट दोन्ही पक्षांचे दावा मिळकतीतील हक्क व हितसंबंध निर्णायक करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप त्यातील मागणी व प्रस्तुत अर्जातील वादी मागणी करत असलेली दुरुस्ती ध्यानात घेता न्यायाचे हित जोपासण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणे उचित होईल. अशा परिस्थितीत सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये मंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे एकंदरीत सर्व कारणमीमांसा ध्यानात घेता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. वादीचा अर्ज रु. १००/– खर्चासह मंजूर करण्यात येतो.
२. वादी यांनी प्रतिवादी यांना आदेशान्वये रु. १००/– पुढील तारखेस दयावी.
३. अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादी दाव्यात करु इच्छीत असलेली दुरुस्ती त्यांनी पुढील तारखेपर्यंत करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करुन प्रतिवादींना द्यावी.

सही/–
(श्रीमती रेवती पी. बागडे)
दिनांक – १९/०९/२०२५. ४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बार्शी.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.V. Kokate (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. Revati P. Bagade, 4th Jt. Civil Judge, J.D.& J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 19/09/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 20/09/2025 |